MHNS140005242025

**<u>नियमित दिवाणी दावा क्रं.९७/२०२५ मधील नि.क्र. ३६ वरील आदेश</u>**

प्रतिवादी क्र. १ ,३, ५ तर्फे प्रस्तुतचा अर्ज हा कैफियत व जबाब दाखल करण्यास झालेला १७ दिवस विलंब माफ होवुन मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. सदर प्रतिवादींनी असे कथन केले आहे की, त्यांना दाव्याची माहिती घेवून त्या कामी आवश्यक ते कागदपत्र मिळवणेकामी बराच कालावधी लागला त्यामुळे त्यांना मुदतीत जबाब कैफियत दाखल करता आला नाही. सदरील विलंब या प्रतिवादींनी जाणुनबुजून किंवा हेतुपुरस्सर पणे केला नाही. योग्य व वाजवी कारणास्तव कैफियत दाखल करण्यास विलंब झाला आहे. सदर प्रतिवादींची कैफियत व जबाब दाव्यात दाखल करुन घेणे न्यायाच्या व कायदयाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. तसे झाले नाही तर या प्रतिवादींना त्यांची बाजू न्यायालयासमोर योग्य प्रकारे मांडता येणार नाही व या प्रतिवादींचे कधीही न भरुन निघणारे नुकसान होईल. सबब, प्रतिवादींना कैफियत व जबाब दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून त्यांची कैफियत व जबाब अभिलेखावर दाखल करण्यात यावी.

३. वादीच्या वकिलांनी सदर अर्जावर योगय तो आदेश होण्यास हरकत नाही,

असे कथन केले.

**४.** अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. त्याचप्रमाणे दोन्ही बाजुचा युक्तीवाद विचारात घेतला.

**५.** न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुतचा दावा हा ठराव व निरंतर ताकिद हुकूमासाठी दाखल केला आहे. दाव्याचे स्वरुप विचारात घेता सदर प्रतिवादींना त्यांची कैफियत दाखल करण्याची संधी देणे योग्य व संयुक्तीक आहे, तसेच प्रतिवादी झालेला विलंब पाहता व अर्जात नमुद कारणे विचारात घेता प्रतिवादीचा अर्ज मंजूर करणे योग्य व संयुक्तिक आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आ दे श**

१. अर्ज नि.क्र.३६ मंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तुत प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्यात येते.

PANDIT ASHWINI ANIL

Digitally signed by PANDIT ASHWINI ANIL
Date: 2026.03.10 17:23:05 +0530

दि. १०/०३/२०२६ (ए. ए. पंडित)

दिंडोरी. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, दिंडोरी.